# प्रेसनोट

ला.प्र. विभाग, धुळे
दिनांक १२.११.२०२५

**जनता शिक्षण प्रसारक संस्था, बेटावद, ता. शिंदखेडा, जि. धुळे संचलित महात्मा गांधी विद्यालय, मांजरोद, ता. शिरपुर या शाळेचे मुख्याध्यापक कैलास पाटील व उपशिक्षक गोपाळ पाटील यांनी तक्रारदार यांचेकडुन १५,०००/— रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम उपशिक्षक गोपाळ पाटील यांचे हस्ते स्विकारल्याने गुन्हा**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | धुळे |
| **पो. ठाणे, गुन्हा नोंद क्रमांक** | थाळनेर पो. स्टे. गुरनं. /२०२५, जि. धुळे |
| **कलम व गुन्हा दाखल दिनांक** | भ्र.प्र. कायदा कलम ७ प्रमाणे, दि. १२.११.२०२५ |
| **आरोपीचे नांव, वय व कार्यालय** | ०१) कैलास सखाराम पाटील, वय ५६ वर्षे, मुख्याध्यापक, जनता शिक्षण प्रसारक संस्था, बेटावद ता. शिंदखेडा जि. धुळे संचलित महात्मा गांधी विद्यालय, मांजरोद, ता. शिरपुर<br>०२) गोपाल रघुनाथ पाटील, वय ४७ वर्षे, उपशिक्षक, जनता शिक्षण प्रसारक संस्था, बेटावद ता. शिंदखेडा जि. धुळे संचलित महात्मा गांधी विद्यालय, मांजरोद, ता. शिरपुर |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | १५,०००/— रुपये |

**<u>थोडक्यात हकिगत :—</u>** तक्रारदार हे जनता शिक्षण प्रसारक संस्था, बेटावद ता. शिंदखेडा जि. धुळे संचलित महात्मा गांधी विद्यालय, मांजरोद, ता. शिरपुर या शाळेत उपशिक्षक या पदावर कार्यरत असुन त्यांची जुलै २०२३ पासुन एक वर्षाकरीता वार्षिक वेतनवाढ स्थगित करण्यात आली होती. तसेच तक्रारदार यांना सेवेस बारा वर्षे पुर्ण होवुन देखील वरिष्ठ वेतनश्रेणी लागु केली नसल्याने तक्रारदार यांनी शाळेचे मुख्याध्यापक आलोसे क्र. ०१ यांची भेट घेवुन त्यांना स्थगित केलेली वेतनवाढ व वरिष्ठ वेतनश्रेणी लागु करणेबाबत विनंती केली असता त्यांनी तक्रारदार यांना स्थगित केलेली वेतनवाढ व वरिष्ठ वेतनश्रेणी लागु करण्यासाठी उपशिक्षक गोपाळ पाटील यांच्याकडे १५,०००/— रुपये द्यावे लागतील, त्याशिवाय तुझे काम होणार नाही असे सांगितल्याने तक्रारदार यांनी ला.प्र.वि. धुळे घटकाकडे दुरध्वनीव्दारे माहिती दिली होती. सदर माहितीवरुन धुळे ला.प्र. विभागाच्या पथकाने शिरपुर येथे जावुन तक्रारदार यांची तक्रार नोंदवुन घेतली.

सदर तक्रारीवरुन दि.०६.११.२०२५ रोजी पडताळणी केली असता मुख्याध्यापक आलोसे क्र. ०१ यांनी तक्रारदार यांना त्यांच्या कामाबाबत उपशिक्षक आलोसे क्र. ०२ यांना भेटण्यास सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी आलोसे क्र. ०२ यांची भेट घेतली असता आलोसे क्र. ०२ यांनी तक्रारदार यांच्याकडे पंचासमक्ष १५,०००/— रुपये लाचेची मागणी करुन लाच स्विकारण्याचे मान्य केले होते.

त्यानंतर दि.१२.११.२०२५ रोजी सापळा कारवाई दरम्यान आलोसे क्र. ०२ यांनी तक्रारदार याच्याकडुन १५,०००/— रुपये लाचेची रक्कम स्वत: स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात येवुन दोन्ही आलोसे यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

| | |
|---|---|
| **सापळा पर्यवेक्षण अधिकारी** | सचिन साळुंखे, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि. धुळे<br>मो. नं. ९८३४२०२९५५, ९४०३७४७१५७ |
| **सापळा अधिकारी** | यशवंत बोरसे, पोलीस निरीक्षक |
| **सापळा पथक** | पद्मावती कलाल, पोलीस निरीक्षक,<br>पोहेकॉ. राजन कदम, मुकेश अहिरे, प्रविण मोरे, संतोष पावरा, पोकॉ. मकरंद पाटील, प्रविण पाटील, प्रशांत बागुल, पोकॉ. सागर शिर्के, पोकॉ. प्रितेश चौधरी, मपोकॉ. रेश्मा परदेशी, पोहेकॉ. सुधीर मोरे, पोकॉ. जगदीश बडगुजर |
| **तपास अधिकारी** | सचिन साळुंखे, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि. धुळे |
| **मार्गदर्शन** | १) मा. श्री भारत तांगडे, पोलीस अधीक्षक<br>२) मा. श्री. माधव रेडडी, अपर पोलीस अधीक्षक<br>३) मा. श्री. सुनिल दोरगे, अपर पोलीस अधीक्षक,<br>लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक |

सत्यमेव जयते
धुळे

**लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकिय/ निम शासकिय अधिकारी / कर्मचारी अथवा खाजगी पंटर यांनी काम करुन देण्यास लाचेची मागणी केल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे संपर्क साधावा.**

**<u>“लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे आपले सेवेशी सदैव तत्पर”</u>**


**संपर्क पत्ता** :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे
**संकेतस्थळ** :— acbmaharashtra.gov.in
**ईमेल** :— dyspacbdhule@gmail.com
**टोलफ्री क्रमांक** :— १०६४
**दुरध्वनी क्रमांक** :— ०२५६२—२३४०२०

(सचिन साळुंखे)
पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,धुळे.